आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१० एप्रिल २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी आसाममध्ये ८५, केरळममधे ७८ तर पुदुचेरीत सुमारे ९० टक्के मतदान/ प्रथमच संपूर्ण मतदान प्रक्रीयेचं वेब कास्टिंग

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आठ खासदार फुटून शिवसेनेत येणार असल्याचं वृत्त एकनाथ शिंदे यांनी फेटाळलं

- वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचा पदाचा राजीनामा

**आणि**

- मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर विभागाच्या कारवाईत सुमारे ३० किलो सोनं जप्त

**<><><><><>**

आसाम, केरळ आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी काल शांततेत मतदान झालं. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, आसाममध्ये ८५ पूर्णांक ३८ शतांश टक्के, तर पुदुचेरीमध्ये जवळपास ९० टक्के मतदान झालं. दोन्ही राज्यातली मतदानाची ही आतापर्यंतची सर्वाधिक टक्केवारी आहे. केरळमध्येही ७८ टक्क्यापेक्षा जास्त मतदानाची नोंद झाली.

ही मतदान प्रक्रिया सुरू असताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, डॉक्टर एस.एस. संधू आणि डॉक्टर विवेक जोशी या अन्य दोन निवडणूक आयुक्तांसमवेत थेट वेबकास्टिंगद्वारे या प्रक्रियेचं निरीक्षण करत होते. यंदा प्रथमच या भागांतल्या सर्व मतदान केंद्रांचं वेबकास्टिंग करण्यात आलं. याशिवाय सर्व इव्हीएम मतपत्रिकांवर उमेदवारांची रंगीत छायाचित्रं, मतदारांना त्यांचे मोबाईल फोन ठेवण्यासाठी खास सोय, नव्याने डिझाईन केलेल्या मतदार माहितीपत्रिका, प्रत्येक

मतदान केंद्रावर बाराशे मतदारांची मर्यादा अशा मतदारस्नेही उपाययोजनाही या निवडणुकांमध्ये प्रथमच राबवण्यात आल्या.

<><><><><>

तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी विविध राजकीय पक्षाचे वरिष्ठ नेते प्रचारसभा घेत असल्यानं या दोन्ही राज्यांमध्ये प्रचाराला चांगलाच वेग आला आहे. तमिळनाडूच्या सर्व मतदारसंघात येत्या २३ एप्रिलला मतदान होईल.

<><><><><>

पश्चिम बंगालविधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीचा जाहीरनामा आज ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी प्रसिद्ध केला. संकल्प पत्र नावानं प्रकाशित या घोषणापत्रात महिला, युवावर्ग आणि सरकारी कर्मचाऱ्यांना मोठी आश्वासनं दिली आहेत. पश्चिम बंगालमधे पहिल्या टप्प्यात २३ एप्रिलला मतदान होणार असून १५२ जागांसाठी १ हजार ५८६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राज्यसभेचे मावळते उपाध्यक्ष हरिवंश यांची राज्यसभेचे सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. हरिवंश यांचा कार्यकाळ काल समाप्त झाला. माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई राज्यसभेतून निवृत्त झाल्यानंतर रिकाम्या झालेल्या जागेवर हरिवंश यांची नियुक्ती झाली आहे. गृह मंत्रालयानं आज याबाबतची अधिसूचना जारी केली.

<><><><><>

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. राज्यसभेचे अध्यक्ष उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. रालोआ तर्फे येत्या १४ तारखेला बिहारच्या नवीन मुख्यमंत्र्यांची निवड होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ८ खासदार फुटून शिवसेनेत येणार असल्याचं वृत्त शिवसेनेनं फेटाळलं आहे. ठाकरे गटाच्या खासदारांसोबत झालेल्या कथित बैठकीचं वृत्त पूर्णपणे निराधार, खोडसाळ आणि गैरसमज निर्माण करणारं असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बोलत होते. अशी कोणतीही बैठक झालेली नाही, त्यामुळे माध्यमांनी अशा बातम्या देणं टाळलं पाहिजे असंही शिंदे यांनी सांगितलं.

<><><><><>

वादग्रस्त न्यायमूर्ती  यशवंत वर्मा यांनी आज पदाचा राजीनामा दिला. अलाहाबाद न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून काम करत असताना वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात जळालेल्या नोटा आढळल्याप्रकरणी त्यांच्यावर महाभियोग चालवण्यात येत होता. राजीनाम्यासाठी वेगळं कारण न देता, आपण अतिशय शोकसंतापाने पदाचा राजीनामा देत असल्याचं त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना उद्देशून लिहीलेल्या राजीनामापत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलच्या आकडेवारीनुसार २०२५ या वर्षात देशभरात सायबर घोटाळ्याची २८ लाख प्रकरणं आणि सुमारे  २२ हजार ९३१ कोटी रुपयांचा अपहार नोंदवला गेला.  याची दखल घेऊन रिझर्व्ह बँकेनं डिजिटल घोटाळे किंवा फसवणूक टाळण्याच्या दृष्टीनं ४ नवीन उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. १० हजार रुपयांपेक्षा जास्तीचा डिजिटल व्यवहार पूर्ण करण्यासाठी एका तासाचा विलंब अवधी, वरिष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी सहाय्यकाकडून प्रमाणीकरण, ग्राहकांना डिजिटल पेमेंट करताना अधिक नियंत्रण सुविधा इत्यादी उपाययोजनांचा त्यात समावेश आहे.

रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावर हे प्रस्ताव उपलब्ध असून त्यावर नागरिकांनी ८ मे पर्यंत आपल्या सूचना, प्रतिक्रिया मांडाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

<><><><>

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुमारे ३० किलो सोन्याच्या तस्करीचा प्रयत्न महसूल गुप्तचर संचालनालयानं हाणून पाडला. ऑपरेशन धहाबू ब्लिट्स कारवाईत पकडण्यात आलेल्या सोन्याचं मूल्य ३७ कोटी ७४ लाख रुपये इतकं आहे. याप्रकरणी २४ महिलांना अटक झाली आहे.

<><><><>

विधिमंडळातील युवा सदस्यांनी आपल्या मतदारसंघाच्या विकासाबरोबरच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासन अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले. पणजी येथे आयोजित केलेल्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या परिषदेमध्ये "विकसित भारताचं उद्दीष्ट साध्य करतेवेळी विधिमंडळातील युवा सदस्यांची भूमिका" या विषयावर ते बोलत होते. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली ही दोन दिवसीय परिषद होत आहे.

<><><><>

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी कॉमेडियन कुणाल कामरा काल महाराष्ट्र विधानमंडळाच्या विशेषाधिकार समितीसमोर हजर झाले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या संदर्भात जे वक्तव्य केले त्याबाबत कोणतीही खंत नसल्यानं याप्रकरणी माफी मागणार नसल्याची भूमिका कामरा यांनी मांडली. कुणाल कामरा यांना चौकशीवेळी २४ प्रश्न विचारल्याचंविशेषाधिकार समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांनी सांगितलं.याप्रकरणी

कामरा यांनी बिनशर्त माफी मागितली तर वेगळ्या पद्धतीनं विचार करू असंही लाड यांनी सांगितलं.

<><><><><>

येत्या १४ एप्रिलला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सर्वत्र चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश कोकण विभागाचे आयुक्त रुबल अगरवाल यांनी दिले. यंदा दादर इथल्या चैत्यभूमीवर लाखो समर्थक जमण्याची शक्यता असून यावेळी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी केली जाणार आहे. तसंच सामाजिक समानता सप्ताह देखील पाळला जाणार आहे.

<><><><><>

आय पी एल क्रिकेट मध्ये आज राजस्थान रॉयल्सचा सामना रॉयल्स चॅलेंर्जस बेगंळुरु बरोबर होणार आहे. या सामन्याला संध्याकाळी साडेसात वाजता गुवाहाटीमधे सुरुवात होईल.

<><><><><>

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात आतापर्यंत पाच लाख ७२ हजारांहून अधिक कुटुंबांनी स्वगणना सुविधेचा लाभ घेतला आहे. जनगणनेचा पहिला टप्पा १ एप्रिल रोजी सुरू झाला असून, स्वगणना सुविधा सध्या अकरा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १५ एप्रिलपर्यंत सुरु राहणार आहे. घरांची नोंदणी आणि गृहगणना १६ एप्रिलपासून सुरू होईल आणि १५ मे पर्यंत चालणार आहे. महाराष्ट्रात स्वगणनेचा प्रारंभ येत्या १ मे रोजी होईल.

<><><><><>

आज जागतिक होमिओपॅथी दिन साजरा होत आहे. होमिओपॅथी या उपचारपद्धतीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनेमान यांच्या जयंतीदिनी म्हणजे दरवर्षी १० एप्रिलला हा

दिवस साजरा केला जातो. 'शाश्वत आरोग्यासाठी होमिओपॅथी' ही या वर्षीच्या जागतिक होमिओपॅथी दिनाची संकल्पना आहे.

<><><><><>

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आगामी गगनयान मोहिमेसाठी दुसरी  एकात्मिक एअर ड्रॉप चाचणी  यशस्वीरीत्या पूर्ण केली. आंध्र प्रदेशातल्या श्रीहरीकोटा इथं ही चाचणी करण्यात आली. अंतराळवीर ज्या कॅप्सूलमध्ये बसतात, तिला  पृथ्वीच्या आवरणात पुन्हा  प्रवेश करता यावा आणि सुखरूप  उतरता यावं, यादृष्टीनं ही चाचणी महत्त्वपूर्ण मानली जाते.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल इसरोचं अभिनंदन केलं आहे.

//<><><><><>//